राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षण
सर्व समावेशक सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२
दिनांक: १० ऑक्टोबर, २०१७.

**वाचा:**

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ०१ जुलै, २०१६.

**शुध्दीपत्रक:**

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयान्वये, राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षणाच्या सर्व समावेशक सूचना देण्यात आल्या आहेत उक्त, दि.०१.०७.२०१६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२ मधील क्रीडाविषयक अर्हता नमूद असणाऱ्या तक्त्यामध्ये अशंत: बदल करुन त्याऐवजी खालील क्रीडा विषयक अर्हता ग्राह्य धरण्यास शासन मान्यता देत आहे:-

| गट | क्रीडा विषयक अर्हता (सुधारित परिशिष्ट "अ-१" प्रमाणे) | खेळविषयक पात्रता | |
|---|---|---|---|
| | | वैयक्तिक स्पर्धा | सांघिक स्पर्धा |
| अ | i) अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा (वरिष्ठ गट)<br>ii) पॅरा ऑलिम्पिंक आंतरराष्ट्रीय स्पर्धा<br>iii) जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा<br>iv) आंतरराष्ट्रीय शालेय महासंघा-द्वारा आयोजित जागतिक शालेय क्रीडा स्पर्धा<br>v) ग्रॅन्डमास्टर किताब | महाराष्ट्राच्या खेळाडूने भारताचे प्रतिनिधित्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान /सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक/ ग्रॅन्डमास्टर किताब अथवा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत सहभाग | महाराष्ट्राच्या खेळाडूचा समावेश असलेल्या भारतीय संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान /सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक |
| ब | i) अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा (कनिष्ठ गट)<br>ii) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा ( वरिष्ठ गट)<br>iii) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा ( कनिष्ठ गट) | महाराष्ट्राच्या खेळाडूने भारताचे प्रतिनिधित्व करताना /महाराष्ट्राचे /विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, | महाराष्ट्राच्या खेळाडूचा समावेश असलेल्या भारतीय संघाने /महाराष्ट्राच्या/ विद्यापीठाचे संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक/ |

| | | | |
|---|---|---|---|
| | iv) पॅरा ऑलिम्पिंक राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा<br>v) राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा<br>vi) राष्ट्रीय ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा<br>vii) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा<br>viii) आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा | रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक/ अथवा) आंतरराष्ट्रीय मास्टर किताब मिळविणे आवश्यक | ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत सहभाग. |
| क | (i) राज्य स्तरावरील वरिष्ठ क्रीडा स्पर्धा<br>(ii) राज्यस्तर कनिष्ठ गटातील क्रीडा स्पर्धा<br>(iii) राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा<br>(iv) ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा<br>(v) राज्यस्तर आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा (अश्वमेध)<br>(vi) राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा<br>(vii) राज्यस्तर पॅरा ऑलिम्पिंक क्रीडा स्पर्धा<br>(viii) राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धा | राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे/राज्य स्तरावर संबंधित विभाग/जिल्हयाचे प्रतिनिधित्व करून प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक | राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे/राज्य स्तरावर संबंधित विभाग/जिल्हयाचे प्रतिनिधित्व करून संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक |
| ड) | (i) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गट | वरिष्ठ गट स्पर्धेत सहभाग | वरिष्ठ गट स्पर्धेत सहभाग |
| | (ii) पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा | वरिष्ठ गट स्पर्धेत सहभाग | वरिष्ठ गट स्पर्धेत सहभाग |

२. संदर्भाधिन शासन निर्णयासोबतचे “परिशिष्ट अ” रद्द करण्यात येत असून त्या ऐवजी खालील “सुधारित परिशिष्ट अ-१” ग्राह्य धरण्यात यावे :-

## सुधारित परिशिष्ट अ-१

| गट- अ साठी पात्र क्रीडा स्पर्धा | गट-ब साठी पात्र क्रीडा स्पर्धा |
|---|---|
| १ | २ |
| १.अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा :-<br>I) ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा.<br>II) एशियन्स गेम्स.<br>III) जागतिक क्रीडा स्पर्धा.<br>IV) एशियन चॅम्पियशीप.<br>V) कॉमनवेल्थ गेम्स. | गट अ पदाकरीता विहीत केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू<br>अथवा<br>१. अधिकृत आंतरराष्ट्रीय कनिष्ठ गटातील :-<br>I) ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियशीप<br>II) युथ कॉमनवेल्थ गेम्स |

| | |
|---|---|
| VI) कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप.<br>VII) युथ ऑलिम्पिक.<br>VIII) ग्रॅडमास्टर (बुध्दिबळ) | III) कनिष्ठ गटातील एशियन चॅम्पियनशीप<br>IV ) कनिष्ठ गटातील कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप<br>v) आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा (बुध्दिबळ) |
| २. पॅरॉलिम्पिंक आंतरराष्ट्रीय स्पर्धा :-<br>I) पॅरॉलिम्पिक गेम्स.<br>II) पॅरा एशियन गेम्स.<br>III) वर्ल्ड पॅरॉलिम्पिक गेम्स. | २) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गट :-<br>I) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा.<br>II) अधिकृत राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट)<br>३) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा कनिष्ठ गट:-<br>I) राष्ट्रीय ज्युनियर गट अजिंक्यपद स्पर्धा |
| ३) जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा:-<br>I) जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा बोर्डाने आयोजित केलेले खेळ. | ४) पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय स्पर्धा :-<br>I) पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय अजिंक्य पद स्पर्धा |
| ४) आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारा आयोजित जागतिक शालेय क्रीडा स्पर्धा :- आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारे आयोजित केलेले खेळ . | ५ ) राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा . |
| ५) ग्रॅन्ड मास्टर किताब | ६) राष्ट्रीय ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा |
| (टिप- उपरोक्त नमूद अ.क्र.१,३,व ४ या क्रीडा स्पर्धांना ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स या स्पर्धाचा समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी व खो-खो हे देशी खेळच ५% आरक्षणासाठी पात्र राहतील) | ७) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा<br>८) आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा<br>(टिप : अ.क्र.१,२,३,५,६ व ७ या स्पर्धांमधील ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी व खो-खो हे देशी खेळच ५ % खेळाडू आरक्षणासाठी पात्र राहतील.) |

| **गट -क साठी पात्र क्रीडा स्पर्धा** | **गट-ड साठी पात्र क्रीडा स्पर्धा** |
|---|---|
| **३** | **४** |
| गट -अ व गट -ब या पदाकरीता विहीत केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू<br>अथवा | अ/ ब / क या पदाकरीता विहित केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू<br>अथवा |
| १) राज्य स्तर वरिष्ठ क्रीडा स्पर्धा<br>I) राज्यस्तर वरिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा | १. वरिष्ठ गटातील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धातील सहभाग |
| २) राज्यस्तर कनिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा | २.पॅराऑलिम्पिक राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गटातील सहभाग . |

| | |
|---|---|
| ३) राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा | (टिप - अ.क्र.१ मधील सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स आणि कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कब्बडी व खो-खो हे नमूद देशी खेळच ५ % खेळाडू आरक्षणासाठी पात्र असतील.) |
| ४) राज्यस्तर ग्रामिण व महिला क्रीडा स्पर्धा | |
| ५) राज्यस्तर आंतरविद्यापीठ स्पर्धा (अश्वमेध) | |
| ६) राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा | |
| ७) राज्यस्तर पॅराऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा | |
| ८) राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धा | |
| (टिप - अ.क्र.१ ते ५ मधील सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स आणि कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कब्बडी व खो-खो हे देशी खेळच ५ % खेळाडू आरक्षणासाठी असतील.) | |

३. हे आदेश शासन शुध्दीपत्रक निर्णयाच्या दिनांकानंतर होणाऱ्या भरतीस लागु राहतील.

४. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७१०१०१४३३२९०८२१ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca28026 7c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2017.10.10 14:24:22 +05'30'

**( राजेंद्र पवार )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्र्याचे सचिव.
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
५. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे.
६. संचालक, शिक्षण (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे.
७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
९. लोकायुक्त, महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,मुंबई.
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर.

११. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.
१३. सर्व मंत्रालयीन विभाग.
१४. सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख.
१५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१६. सर्व शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद.
१७. सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य.
१८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय,मुंबई.
१९. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी.
२०. निवड नस्ती, क्रीयुसे-२.